**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यार्थ्यांनो ! बेसिक बाबींवर लक्ष केंद्रीत करा - डॉ. श्रीधर
## रसायनशास्त्र विभागाच्यावतीने स्मृती रसायन व राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन

अमरावती.

विज्ञान विषयामध्ये मूलभूत बाबी आणि बेसिक सायन्सेस ह्या गोष्टी महत्वाच्या असून विद्यार्थ्यांनी अभ्यास करतांना बारकाईने निरीक्षण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन आय.आय.सी.टी., हैद्राबादचे वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बी. श्रीधर यांनी केले. रसायनशास्त्र विभागाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त स्मृती रसायन आणि ॲडव्हान्सेस इन केमिकल सायन्सेस वर राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन नुकतेच करण्यात आले, त्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून विद्यार्थ्याना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, माजी प्र-कुलगुरु डॉ.व्ही.एस. जामोदे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचे डॉ.पी.आर. मंडलिक व डॉ. जागृती बारब्दे उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ. बी. श्रीधर म्हणाले, बी.एस्सी. अभ्यासक्रमामध्ये फन्डामेन्टल अतिशय महत्वाचे आहे, त्याचा बारकाईने विद्यार्थ्यांनी अभ्यास करण्याची गरज आहे. जीवनात लक्ष प्राप्त करण्यासाठी उत्तमोत्तम करण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांकडून होण्याची गरज आहे. याप्रसंगी त्यांनी प्रेरणात्मक कथा सांगून विद्यार्थ्यांचे लक्ष आकर्षून घेतले.

माजी प्र-कुलगुरु डॉ.व्ही.एस. जामोदे म्हणाले, रसायनशास्त्र विभागाच्या स्थापनेला पंचवीस वर्षे पूर्ण झालीत. त्यानिमित्ताने विभाग रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. अतिशय कठीण परिश्रमातून हा विभाग विकसित झाला आहे. डॉ. आनंद अस्वार हे पहिले विभागप्रमुख या विभागाला लाभलेत, हा विभाग मोठा होण्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. राष्ट्रीय स्तरावरील संशोधन या विभागातून होत असून विभागाचे माजी ॲल्युमिनी देशात नव्हे; तर विदेशातील मानांकित संस्थांमध्ये कार्यरत आहेत. विद्यार्थी हीच खऱ्याअर्थाने शिक्षकांची संपत्ती असते, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर म्हणाले, माजी विद्यार्थी हे त्या विभागाचे प्रॉडक्ट असतात. रसायनशास्त्र विभागाला गौरवशाली ॲल्युमिनी लाभलेत, त्याचा आम्हाला अभिमान वाटतो. परिश्रमाशिवाय कुठलेही यश शक्य नाही, विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त परिश्रम करण्याकडे भर द्यावा. ॲल्युमिनी परिश्रमानेच मोठ्या संस्थांमध्ये कार्यरत आहेत. ॲल्युमिनी मीट नॅकमध्ये दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने खूप आवश्यक असतो. रसायनशास्त्र विभागाने त्यादृष्टीने उचललेले पाऊल उपयुक्त असून वर्तमानात विद्यार्थ्यांना ॲल्युमिनीचे मार्गदर्शन यानिमित्ताने प्राप्त होत आहे, ही सुद्धा महत्वाची बाब आहे.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. संत गाडगे बाबा व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन अतिथींच्या हस्ते करण्यात आले. विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार यांनी रोपटे व स्मृतिचिन्ह देवून पाहुण्यांचे स्वागत करुन प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. जागृती ढोरे यांनी करुन दिला. याप्रसंगी बहुमूल्य योगदानाबद्दल माजी विभागप्रमुख तथा माजी प्र-कुलगुरु डॉ.व्ही.एस. जामोदे यांचा शॉल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांनी सत्कार केला. संचालन कु. दिव्या दीक्षीत व कु. अश्विनी पवार यांनी, तर आभार डॉ.पी.आर. मंडलिक यांनी मानले. कार्यक्रमाला विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, माजी ॲल्युमिनी तसेच विद्यापीठ व महाविद्यालयांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,　　　　　　　　　　　　　　　　　　**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी　　　　　　　　दि. १३/०३/२०१८.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी